JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# डॉ. आंबेडकर यांचे षेतीसंबंधीचे विचार व योगदान

प्रा. विलास अ. मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी.

**प्रस्तावना :–**

दलितांना आत्मविष्वास, आत्मसन्मानाचा प्रकाष देणारे युगंधर बाबासाहेब समग्र दलित जीवनाचे प्रेरणा स्थानचं मानव जातीच्या इतिहासात याला तोड नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ञ, षोशित–पिडीत समाजाचे नेते, बुद्ध धम्माचे अनुवर्तक तसेच स्त्रियांच्या व कामगारांच्या हक्कांसाठी लढणारे नेते म्हणून ओळखत असले तरी कृशी विशयक समस्यांबाबत आणि षेतक–यांच्या हक्कांबाबतही त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे.

भारत सर्वात मोठा लोकषाहीचा देष म्हणून जगभरात ओळखला जातो. त्याचबरोबर कृशीप्रधान देष म्हणून सुद्धा ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्थ ही ब–यापैकी षेतीवर अवलंबून आहे. यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी षेतक–यांचे हित साधणा–या विविध उपाय योजना संदर्भात मार्गदर्षन 100 वर्शापूर्वीच केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक किर्तीचे विद्वान, कायदेतज्ञ, संषोधक, थोर अर्थतज्ञ तसेच अत्यंत अभ्यासू षेतीतज्ञही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृश्टी ही असामान्य होती. त्यांना राजकारण, अर्थकारण आणि राज्यघअनेसंबंधी प्रगाढ ज्ञान होते. सन 1942 ते 1946 या कालावधीत त्यांनी त्यांच्या अफाट ज्ञानाचा उपयोग भारताच्या प्रगतीसाठी केलेला दिसून येतो.

## डॉ. आंबेडकर यांचे षेतीविशयक विचार

कृशीप्रधानतेचा वारसा भारताला अगदी प्राचीन काळापासून लाभलेला आहे. भारतातील सर्वात प्राचीन असलेली सिंधू संस्कृती नांगर म्हणून ओळखली जाते. या नांगर संस्कृतीचे अवषेश आम्हाला आजही भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व्यवस्थेत रूजलेले दिसून येतात. प्राचीन काळात षेतीचा षोध लागला आणि भारतातील सामाजिक जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. याच कृशी व्यवस्थेमुळे स्थिर नागरी व कृशी जीवनाची परंपरा निर्माण झाली. कृशी परंपरची ही लक्षणे भारतातील अनेक सण आणि उत्स्वाच्या माध्यमातून जोपासली जातात. षेतीच्या हंगामी काळात अनेक सणाची निर्मीती कृशीप्रधान जीवनाची व प्रगत कृशी परंपरेची साक्ष देतात.

आधुनिक काळात षेती संबंधी तंत्रज्ञान विकसित होते गेले मात्र षेतक–यांच्या षोशणात काहीच फरक पडला नाही. प्राचीन काळापासून आधूनिक काळापर्यंत होत असलेल्या षेतक–यांच्या षोशणाला कुणीही वाचा फोडली नाही. आधूनिक काळातील समाजसुधारकांना ही षेतक–यांच्या व्यथा, वेदना दिसल्या नाहीत. मात्र, आधूनिक काळातील समाजसुधारक ज्यांनी भारतीय समाज व्यवस्था व वर्ण, जात



Scanned with OKEN Scanner

व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास केला त्यात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी षेतक–यांच्या षोशणाची दखल घेतली. षेतक–यांच्या षोशणाला वर्णव्यवस्था कषी जबाबदार आहे, याची चिकित्सा करून षेतक–यांचे प्रष्न सोडविण्याचा प्रयत्न या महामानवांनी केला. सन 1883 मध्ये महात्मा फुले यांनी "षेतक–यांचा आसूड" या ग्रंथात षेतक–यांच्या तत्कालीन दारूण परिस्थितीचे चित्रण अतिषय मार्मिक नोंदविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक तत्वज्ञानाचा उददेष सामाजिक न्याय हाच आहे. त्यांच्या आर्थिक तत्वज्ञानात देषातील षेतकरी, कुळे आणि षेतमजूर या सर्वांच्याच कल्याणाचे जातिनिरपेक्ष

पातळीवरून आर्थिक चिंतन दडले आहे. डॉ. आंबेडकरांनी सन 1918 मध्ये "भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय " या लेखात भारताच्या षेतीप्रष्नावरील अत्यंत मूलभूत प्रष्नावर प्रकाष टाकला आहे.

डॉ. आंबेडकरांनी षेती समस्येवरील उपायसोबतच भूधारकांच्या षोशणाला मूठ माती देण्यासाठी खोती पद्धती विरूद्ध बंड करून दि. 17 सप्टेंबर 1936 रोजी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धत रदद् करण्याविशयक विधेयक सादर केले. खोती अंताचे विधेयक सादर करून जमिनसुधारणेसाठी केलेले त्यांचे महत्वपूर्ण कार्य होय. डॉ. आंबेडकरांनी दि. 10 जानेवारी 1938 रोजी मुंबई येथे आझाद मैदानात कोकण, सातारा, नाषिक वगैरे जिल्ह्यातील षेतक–यांचा मोर्चा घडवून आणला. स्वतंत्र मजूर पक्ष व इतर षेतकरी संघटनांनी मिळून या मोर्चाचे नेतृत्व केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या मोर्चास मार्गदर्षनपर भाशण केले तसेच दि. 10 जानेवारी 1938 रोजी मुंबई सरकारच्या कॉंग्रेस मंत्रीमंडळापुढे डॉ. आंबेडकरांनी षेतक–यांच्या मुलभूत मागण्या सादर केल्या.

### डॉ. आंबेडकरांनी सादर केलेल्या षेतक–यांच्या मुलभूत मागण्या

1) षेतकरी वर्गाला स्वतंत्रपणे व सुखासमाधानाने राहता यावे म्हणून जमिनीची मषागत करणा–यालाच त्यांच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे.

2) जमीन करणा–या षेतक–यांवर कर अगर पटट्‌ी बसविण्यापूर्वी त्याला चारितार्थापुरती योग्य ती सोय करून देणे हे सरकारने आपले कर्तव्य मानले पाहिजे.

3) जमिनीची मषागत करून तीवरच जगणा–या षेतक–यांना न्याय दयायचा असेल व त्यांच्या आर्थिक हिताची व्यवस्था व्हायची असेल तर जमीनदार मध्यस्थ नसले पाहिजेत.

4) त्याचप्रमाणे षेतमजुरांना किमान मजुरी देण्याची कायदयाने सोय करून त्यांच्या हिताला जपणे हे ही लोकमतवादी सरकारचे कर्तव्य आहे.

षेतक–यांच्या मूलभूत मागण्या सरकारपुढे सादर केल्या. भारतीय इतिहासात षेक–यांच्या हितासाठी लढणारे व त्यांच्या मूलभूत मागण्या सरकारपुढे ठामपणे मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले समाजसुधारक होत याची प्रचिती येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारला षेतक–यांच्या मुलभूत मागण्याच पूर्ण करण्यासाठी सुचविले नाही तर षेतकरी ज्या जमीनदारी व भांडवलषाही अर्थव्यवस्थेचे बळी आहेत व ज्या अर्थव्यवस्थेमुळे त्यांची पिळवणूक व षोशण होते अषा सगळया बाबींतून षेतक–यांची मुक्तता व्हावी म्हणून काही तातडीच्या मागण्याही त्यांनी सरकारपूढे सादर केल्या त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे.



Scanned with OKEN Scanner

## षेतक–यांची मुक्तता व्हावी यासाठी सरकारकडे सादर केलेल्या मागण्या

1) ज्याप्रमाणे थकलेला षेतसारा माफ करण्यात आला त्याचप्रमाणे आजपर्यंतच्या थकलेल्या खंडाच्या बाक्याही ताबडतोब माफ कराव्या.

2) जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्नावर सारा माफ करावा व किमान उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या जमिनीवर वाढत्या मानाने सा–याची आकारणी करण्याच्या दृश्टीने जमीन महसूल कायदयात दुरूस्ती झाली पाहिजे.

3) खोती पद्धती व इनामदारी पद्धती या आर्थिकदृश्टया नुकसानकारक व सामाजिकदृश्टया जुलमी असल्यामुळे या पद्धती भपाईसह नश्ट करण्यासाठी कायदा करण्याची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे.

4) तीन वर्शे जमीन कसणा–या कुळाला कायम कुळे समजले जावे, असा कायदा सर्व जमीनदारांच्या कुळांना लागु केला पाहिजे.

5) लहान षेतक–यांची पाणीपटटी 50 टक्क्यांनी कमी केली पाहिजे.

6) सर्व खेडयांना चराई राने असावित.

7) कर्जनिवारणाचा योग्य तो कायदा सर्वत्र लागू होईपर्यंत कर्ज तहकुबी जाहीर करावी.

8) षेतक–यांच्या हातून सावकाराच्या हाती जमीन जाऊ नये या दृश्टीने सावकारीवर बंधन घालावे.

अष्या प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी षेतक–यांच्या पिळवणूकीला जबाबदार असलेल्या सर्व परंपरा व कायदे रदद् करून कायदयात बदल घडवून षेतक–यांची खोत व सावकारापासून कषी सुटका होईल या अनुशंगाने सरकार पुढे तातडीच्या मागण्या केल्या. गरीब व दारिद्रय षेतकरी वर्गाची षोशणातून मुक्तता करून षेतकरी स्वाभिमानी जीवन कसे जगू षकतील, या सर्व गोश्टींचा विचार करून त्यांनी कश्टकरी षेतक–यांच्या कश्टांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी षेतक–यांसाठी चालविलेला लढा बघता तेच ख–या अर्थाने षेतक–यांचे कैवारी होते हे स्पश्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी षेतक–याची वैयक्तिक पातळीवर होणारी पिळवणूक थांबविण्याचा प्रयत्न तर केलाच पण देषाच्या आर्थिक पायाभरणीत षेतीसंबंधी आणखी संषोधन करून षेतकरी व देषपातळीवर अर्थव्यवस्था खंबीर करण्यासाठी राज्य समाजवादाची संकल्पना मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते षेती उद्योग हा मानवी जीवनात सर्वात महत्वाचा उद्योग असून तो प्राथमिक व सर्वात प्राचीन असा उद्योग आहे. या उद्योगाचे ते दोन भाग करतात.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते उद्योगाचे प्रकार

1) प्राथमिक उद्योग

2) दुय्यम उद्योग

जमिनीपासूनच मानवास माती व पाणी प्राप्त झाले आहे. त्याच्या जगण्यासाठी लागणा–या प्राथमिक गरजा ते या जमिनीतूनच मिळवतो. पुढे जगण्यासाठी तो षिकार, मासेमारी, षेती उत्पादन, खनिज प्राप्ती या गोश्टी जमिनीतून घेऊन उपजिविका करतांना दिसतो. या घटकांपासूनच तो त्याच्या



Scanned with OKEN Scanner

भौतिक गरजा भागवत असतो. म्हणून हे घटकही त्याच्या जगण्यासाठी संसाधने ठरतात. हा प्राथमिक उद्योग ठरतो. या संसाधनातून इतर उद्योगासाठी लागणारा कच्चा माल प्राप्त होतो व यापासून तो वस्तू उत्पादन करतो. त्यामुळे जमीन व त्यातून मिळणारे घटक हे या दोन्हीही उद्योगासाठी आवष्यक असतात. एवढेच नव्हे तर याषिवाय उद्योग उभे राहू षकत नाहीत. यात मानवाला आवष्यक असणारा अन्नपूरवठा करणारा उद्योग म्हणून षेती हा सर्वात महत्वाचा उद्योग असल्याचे आपले मत ''स्मॉल होल्डिंग इन इंडिया'' या निबंधात मांडतांना दिसतात. त्यामुळेच षेतीकडे व त्यापासून होणा–या उत्पादनासंबंधी त्यांनी मांडलेले विचार हे मूलभूत व षेतीच्या विकासासाठी अत्यंत आवष्यक आहेत.

भारतात षेती व षेतक–यांच्या प्रष्नाने अनेक रूपे घेतलेली दिसतात. आजमितीस षेती किफायतदार न बनल्यामुळे हजारो षेतकरी आत्महत्या करतांना दिसतात. लोकषाही षासनव्यवस्थेने याची जबाबदारी जनतेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी निवडून दिलेल्या षासनव्यवस्थेवर टाकली आहे. त्यामुळे सराकर वेळोवेळी या संकटातून षेती व षेतकरी मुक्त व्हावा यासाठी वेगेवेगळया योजना पूढे आणते. कर्जबाजारी षेतकरी ही एक मुख्य समस्या आहे. ती सोडविण्यास कर्जमाफी हा एक उपाय षोधला जातो. पूर्वानूभव असे सांगतो की, हा तात्पुरता उपाय ठरतो. आज सरकार सुद्धा हा मुद्दा पुढे आणतांना दिसते. थोडक्यात , आज षेतक–याला षेती किफायतषीर बनविण्यासाठी केवळ कर्जमाफी हा एकमेव मार्ग ठरत नाही. षेती व्यवसाय हा 'उद्योग' म्हणून जोपर्यंत आपण त्यांच्याकडे बघत नाही तोपर्यंत त्यातील प्रष्न सुटत नाही. हा उद्योग मानवाला अन्नपुरवठा करणारा अत्यंत गरजेचा उद्योग असल्यामुळे त्याच्याकडे अन्न उत्पादक उद्योग म्हणून पाहून त्याच्या समस्येकडे आद्य प्रष्न म्हणून पाहिले पाहिजे, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आग्रह आहे. हा उद्योग प्रत्यक्ष अन्ननिर्मिती करणारा असल्यामुळे त्याच्याषी संबंधीत सर्व प्रष्नांचा विचार करून त्या समस्यांचे निराकरण केले पाहिजे. कोणते उत्पादन करावे , या उत्पादनासाठी आवष्यक असणारी षेती, तीचा आकार, तिचा कस, उत्पादन निर्मितीसाठी लागणारी साधने या सर्व गोष्टींचा विचार करून ती षेती किफायतदार होत नसेल तर का घेत नाही? त्याची कारणे षोधून ती किफायतदार कषी होईल यासाठी करावयाचा उपायांचा विचार व त्याची उपलब्धता करणारी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. यासाठी एक जे कारण काही समित्यांनी व षेती अभ्यासकांनी दिलेल्या कारणावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'अल्पभूधाकरणा व षेती एकत्रीकरण व विस्तार' या सुचवलेल्या उपायांची अमंलबजावणी आज भारतातील षेतक–यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. आज आपण पाहतो की, स्वातंत्र्याच्या 68 वर्शानंतरही षेतक–यांची प्रष्ने का सोडविता आले नाही.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय लोकसंख्येविशयीचे मत

भारतात षेती ही किफायतदार होत नसल्याची कारणे अल्पभूधारणा, एकसंद भूधारणा ही नसून वेगळी असल्याचे ते नमूद करतात. त्यात ––

1) भारत हा कृशी प्रधान देष आहे.

2) जगातील षेतीची तुलना करता या षेतीची उत्पादकता सर्वात कमी अषी आहे.

त्यापैकी एक कारण भारतात षेतीवर अवलंबून राहणारी लोक संख्या 71.5 टक्के एवढी आहे. इंग्लंडमधील हीच संख्या 15.3 टक्के तर अमेरिकेत 33.3 टक्के एवढी आहे. थोडक्यात जगातील कुठल्याही देषातील लोक संख्येचा विचार केला तर भारतातील ही संख्या प्रचंड आहे. याचा अर्थ दुस–या षब्दात खुप मोठया प्रमाणातली लोकसंख्या ही षेतीची एवढी गरज नसतांना त्यावर रिकामटेकडी असी आहे. या षेतीवर मोठा बोजा आहे. हा ज्यादा बोजा कमी केल्याषिवाय षेती ही 'किफायतषीर' वा आर्थिक दृश्टया परवडण्यासारखी होणार नाही. म्हणून ही जादाची लोकसंख्या बिगरषेती उद्योगास वापरली पाहिजे.



Scanned with OKEN Scanner

नाही तर एका कविने म्हटले आहे की,

आहे तू षेतकरी राजा

नावा साठी तुझा गाजावाजा

तळहातावर पोसतो जग, तरी तूच का उपाषी !

आज भारतीय षेतक—याची अवस्था वरिल कवीन केलेल्या रचनेसारखीच पहायला मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन 1943 मध्ये षासकीय योजना मांडतांना लिहिले होते की, मुबलक आणी स्वस्त विज पुरवठा उपलब्ध असल्याखेरीज भारताचे औद्योगीकीकरण वेगाने होणार नाही. भारतीय लोक दारिद्रयाच्या दृश्टचक्रात कायमचे अडकले आहेत. हा प्रष्न धसाला लावण्यासाठी त्या काळात त्यांनी अपार मेहनत केली. कोळसा, पेट्रोल, अल्कोहोल व पाण्यापासून विज निर्मिती करणे, अभियंत्यांना परेदषात पाठवून प्रषिक्षण देण, विज व्यवस्थापण, विद्यूत वाणिज्य व वीज अभियांतिकी ही सर्व क्षेत्रे आधूनिक व बळकट बनविण्यासाठी त्यांनी जगभरातल्या या कामाचा अभ्यास करून त्या तोडीची व्यवस्था भारतात उपलब्ध करून देण्याचा चंग बांधला होता. एका षासकीय प्रस्तावात डॉ. आंबेडकर म्हणतात, श्जीम इतवंकमदपदह व जीम मसमबजतपबंस पदकनेजतल दक जीम कमअमसवचउमदज व लिकतव मसमबजतपब चवूमत तम पदमगजतपबंइसल बवददमबजमक ूपजी कमअमसवचउमदज व पदकनेजतपमे दक विवक चतवकनबजपवदश उद्योगधंदे वाढविणे आणि अन्नधान्याचे अधिक उत्पादन करणे या दोन्ही गोश्टी वीजेच्या उपलब्धतेवर अवलंबून आहेत, याचे स्पश्ट विवेचन त्यांनी वारंवार केले आहे.

ज्या पूर्वास्पृष्य समाजाला उच्च जातिंनी पाण्याच्या मुलभत अधिकारापासून वंचित ठेवले आणि ज्यांना गुलामीच्या अंधारात ढकलले त्यातून आलेले बाबासाहेब देषाला पुढची 100 वर्शे अविरत प्रकाष आणि मुबलक पाणी मिळावे, यासाठी चिंतन, नियोजन आणि योजना करीत होते. अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव तरतूद करणे कसे गरजेचे आहे हे ते व्हाइसरॉयला पटवून देत होते. भारतातील पहिली 15 मोठी धरणे बांधण्याचे 'ब्लूप्रिंट' बाबासाहेबांनी तयार केले.

जगप्रसिद्ध जलतज्ञ जॉ. सी. एस. भाभा म्हणतात, "अल्पावधीत आपण जून्यापूराण्या संकल्पनातून अत्याधूनिक अषा जलविकास संकल्पनेकडे वळलो आहोत. त्यासाठी नदी, खोरे विकासाचा विस्तृत आराखडा तयार करण्यात आला. याबाबत दमोदर नदीसंबंधी घेण्यात आलेली पहिली परिशद अतिषय महत्वाची ठरली. कारण तिनेच सर्व मार्गदर्षनाचे काम केले. त्यातूनच पूढे महानदी, कोसी, सोननदी आणि इतर सर्व प्रकल्प तयार झाले. या संदर्भात बहुउददेषीय आणि प्रादेषिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले ते म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. भारतातील प्रत्येक माणसाने त्यांचे ऋणी असले पाहिजे.

दामोदर हिराकुंड, सोननदीचे सर्व प्रकल्प हे बाबासाहेबांच्या कल्पक आणि प्रगल्भ अषा दर्जेदार प्रतिभेतून साकारले आहेत. देषाच्या पुढील 100 वर्शाच्या पाणी व वीजेचे नियोजन आणि त्यासाठीचा निधी त्यांनी मिळवून दिला. बाबासाहेबांच्या या विशयीच्या सूचनांचे पालन राजकर्त्यांनी केले असते तर आज आपला भारत देष भारनियमनमुक्त आणि टॅकरमुक्त दिसला असता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद हजारो वर्शापासून षेती व्यवसायात गुंतलेल्या गरीब कश्टकरी कामगारांना श्रमाचा मोबदला व सामाजिक प्रतिश्ठा मिळवून देणारा होता. जर राज्य समाजवादाचा समावेष राज्यघटनेत केला गेला असता तर आज देषात षेतीसंबंधी व षेतक—यांच्या बाबतची जी समस्या उभी आहे ती समस्या निर्माण झाली नसती.



Scanned with OKEN Scanner

## निश्कर्श :–

एकंदरीत भारतीय षेतक–यांच्या षासनाला समस्या व त्यावरचे उपाय या दोन्ही प्रष्नांची सोडवणूक करायची असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचारांचा अभ्यास भारतीय लोकांना व षासनाला करावाच लागेल. बाबासाहेबांच्या विचारांचा अंगीकार केला असता तर देषाचा आर्थिक विकासाचा पायाभूत आधार असलेल्या षेतक–यांची उपेक्षा व अवहेलना झाली नसती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या षेतीविशयक चितंनावरून भारताच्या षेती व षेतक–यांबदद्ल त्यांना किती आस्था होती, किती आपूलकी होती हे स्पश्टपणे दिसून येते. षेती हा राज्याचा उद्योग बनवून देषाच्या विकासाचा व षेतक–यांच्या उत्थानाचा विचार करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या राश्ट्रभक्त निराळाच.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी षेती विकासासाठी षासनाने पुढाकार घेऊन देषासमोर बेरोजगारी, दारिद्रय या गोश्टीवर मात केली पाहिजे हे उद्दिश्ट समोर ठेवून राज्य समाजवादाचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची षेती व षेतक–या संबंधीची अर्थनिती ही आर्थिक विशमता दूर करणारी आहे. षेतक–यांना न्याय मिळवून देणारी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वंचित षोशित समाजघटकाचे नेते, महामानव, जागतिक किर्तीचे प्रज्ञासुर्य असे विविध पैलू आपल्याला माहित आहेतच. मात्र याच बरोबर ते सर्व जाती–जमातीच्या षेतक–यांचेही उद्धारकर्ते होत. हेही तेवढेच भारतीय इतिहासातील निर्विवाद सत्य होय.

संदर्भ ग्रंथ :–

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे, खंड 10, पृ 126

2) डॉ. यषवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाषन पृ– 59 ते 60

3) डॉ. बाबासाहेब गौरवग्रंथ, महाराश्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पृ– 406

4) ॲड. विश्णू ढोबळे, षेतक–यांच्या आत्महत्या जागतिकिकरणातील षोकांतिका, सुगावा प्रकाषन, पूणे.

5) षेतकरी चळवळ, डॉ. आंबेडकरांची निवडक भाशणे व लेख संपादक– प्रदीप गायकवाड पृ– 30 ते 31.



Scanned with OKEN Scanner